



दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १६२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.२३ जानेवारी २०२५

## जळगाव रेल्वे दुर्घटनेत ११ जणांचा मृत्यू!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, जळगाव :** जळगावमध्ये रेल्वेने काही प्रवाशांना उडावल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुष्पक एक्स्प्रेसमध्ये प्रवास करणाऱ्या काही प्रवाशांनी आग लागल्याची भीतीने ट्रेनमधून खाली उड्या मारल्या. मात्र याच वेळी समोरुन येणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसने या प्रवाशांना उडवलं. यामध्ये ११ प्रवाशांची मृत्यू झाल्याची माहिती जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली आहे. या दुर्घटनेची माहिती समोर आल्यानंतर तात्काळ मदतकार्यक केले जात आहे.



**११ मृत्यू ४ जण गंभीर जखमी**

गुलाबराव पाटील यांनी सांगितलं की कर्नाटक एक्सप्रेसने उडवल्याने ११ लोकांचा मृत्यू झाला आहे. ज्यापैकी चार जणांचे मृतदेह पाचोरा येथे आहेत. तर आठ मृतदेह हे जळगावला पाठवण्यात आले आहेत. तसेच चार लोक गंभीर जखमी आहेत, त्यांना वृंदावन या खाजगी रुग्णालयात उपचार केले जात आहेत. ७ जणांना किरकोळ जखमा झाल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात जळगाव- मुंबई रेल्वे मार्गावर माहिजी आणि पारधाडे स्थानकादरम्यान ही भीषण दुर्घटना घडली आहे.

**गुलाबराव पाटील काय म्हणाले?**

परधाडे गावाजवळ ही घटना घडली आहे. रेल्वे रुळ ओलांडताना ही दुर्घटना घडल्याचे काही लोकांचे म्हणणे आहे. तर काही लोकांचे म्हणणे आहे की आग लागल्याच्या अफवेने लोकांनी उड्या मारल्या. १५ ते २० मिनिटात प्रांत अधिकारी आणि कलेक्टर घटनास्थळी पोहचत आहेत. घटनास्थळी पोहचायला जळगावहून ३० ते ४० मिनिटं लागतात. पण जोपर्यंत इथं कोणी जाणार नाही तोपर्यंत हे लक्षात येणार नाही, अशी प्रतिक्रिया गुलाबराव पाटील यांनी टीव्ही९ शी बोलताना दिली.

**जळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांनी काय सांगितलं?**

या दुर्घटनेबद्दल जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी माहिती देताना सांगितले की, मध्य रेल्वेच्या कंट्रोल रुमकडून माहिती देण्यात आली की, कर्नाटक एक्स्प्रेसबरोबर एक अपघाताची घटना घडली, ज्यामध्ये ७ ते ८ लोकांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून आपण तात्काळ रुग्णवाहिका घटनास्थळी पाठवल्या. प्रांत अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिस अधिकारी देखील पोहचले आहेत.रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी देखील दुर्घटनेनंतर मदतकार्य करत आहेत. ते एबीपी म झाशी बोलताना दिली.

ग्रामीण रुग्णालय, खाजगी रुग्णालय आणि शासकिय वैद्यकीय महाविद्यालय या तीन रुग्णालयाकडून मदत घेतली जात आहे. त्यामध्ये सर्व रुग्णांना मदत केली जात आहे असेही प्रसाद म्हणाले. प्राथमिक माहितीनुसार, ६ ते ८ चा आकडा सांगितला जात आहे. अजून अधिकृत आकडेवारी मिळालेली नाही. सध्या आपली प्राथमिकता जखमींना उपचार देण्याची आहे, असेही आयुष प्रसाद म्हणाले.

**रेल्वे आधिकाऱ्यांने सांगितलं नेमकं काय झालं?**

मध्य रेल्वेचे सीपीआरओ स्वप्नील निला यांनी अपघाताबद्दल माहिती देताना सांगितले की, जळगावमध्ये लखनऊहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या दिशेने येणाऱ्या पुष्पक एक्स्प्रेसमध्ये पाचोरा स्टेशनजवळ, अलार्म चेन पुलिंगची घटना घडली. या घटनेनंतर काही प्रवासी ट्रेनमधून खाली उतरले होते. त्याच वेळी विरुद्ध दिशेने जात असलेली कर्नाटक एक्सप्रेस गाडी तेथून जात होती जिचा काही प्रवाशांना ट्रेनची धडक दिल्याची माहिती आम्हाला मिळाली.

ते पुढे बोलताना म्हणाले की, प्राथमिक माहितीनुसार, ७ ते ८ प्रवासी जखमी झाले आहेत, त्यांच्या उपचारासाठी आम्ही जवळच्या रुग्णालयांची मदत घेतली आहे. कर्नाटक एक्स्प्रेसने आपला पुढील प्रवास पुन्हा सुरू केला आहे आणि जखमी प्रवाशांना मदत मिळाल्यानंतर लगेच पुष्पक एक्स्प्रेस देखील आपला प्रवास पुन्हा सुरू करेल.

## गोकुंदा किनवट रस्त्याच्या अपघातात एकाचा मृत्यू तर ३ जण गंभीर



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.२२, किनवट (नांदेड) :** गोकुंदा ते किनवट मार्गावर मोटरसायकल आणि ऑटोचा जोरदार धडकेने एकाचा जागेवर मृत्यू झाला. याबाबत समजलेली सविस्तर माहिती अशी की, खरबी कॉर्नर पशी ग्राम सेवक बटूर साहेब यांचा जागीच मृत्यू झाला. तर शेख अहमद शेख कमाल खान गंभीर जखमी झाल्यामुळे अधिक उपचारासाठी आदिलाबाद येथे रेफर करण्यात आली आहे. इतर जखमींना ग्रामीण रुग्णालय गोकुंदा येथे उपचार सुरू आहे.

सकाळी साडे सातच्या दरम्यान ऑटो गोकुंदा ते किनवट कडे जात असताना त्याच वेळी ऑटो आणि मोटरसायकल एकमेकांना धडकल्याने ऑटो जागीच पलटी होऊन एक व्यक्ती जागीची मृत्यू तर तीन जण गंभीर जखमी झाल्याने किनवट तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. किनवट शहरांमध्ये तेलंगणा राज्यातील पिवळ्या ऑटो चा ऊत आला असून बऱ्याच ऑटो धारकाकडे कागदपत्रे नसताना सुसाट वेगाने ऑटो चालवतात यातच सुसाट वेगाने चालवणारा अज्ञान पल्सर दुचाकी वाहन धारकाच्या धूम स्टाईल मुळे दुचकी व ऑटो चालकांमध्ये हा जीवघेणा अपघात झाल्याची चर्चा घटनास्थळावर उपस्थित नागरिकांमध्ये होत होती. अज्ञात पल्सर दुचकी धारक फरार झाला असून या पिवळ्या ऑटो वरती पोलीस प्रशासन कारवाई करतील का व आणि कितीक अपघाताचे वाट पाहणार आरटीओ पोलीस प्रशासन असे जनतेतून बोलले जात आहे.

## अंमली पदार्थ पथकाची धडक कारवाई

### गांजा विकणाऱ्यास अटक !



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२२, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पश्चिम येथील सिद्धार्थ नगर भागात एका व्यक्तीला गांजा विक्री करताना अंमली पदार्थ विशेष पथकाने रंगेहात अटक केली आहे. पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ अंतर्गत या कारवाईदरम्यान, आरोपीच्या ताब्यातून ८०,१७५ रुपये किमतीचा, ३२०७ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला आहे.

विशेष पथकाला दि. २१ रोजी डोंबिवली पश्चिम, सिद्धार्थ नगर येथे एका व्यक्तीमार्फत गांजाची विक्री होत असल्याची माहिती मिळाली. यानंतर पोलीस उपनिरीक्षक चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने घटनास्थळी छापा मारला. पोलीस शिपाई गौतम जाधव, गुजर आणि सोनवणे यांनी त्वरित कारवाई करत लीलाधर सुरेश ठाकर (३५), रा. कोपर क्रॉस रोड, डोंबिवली पश्चिम, याला ताब्यात घेतले. आरोपीकडून एकूण ३२०७ ग्रॅम वजनाचा गांजा हस्तगत करण्यात आला असून, याची एकूण किंमत ८०,१७५ रुपये आहे. सदर प्रकरणी विष्णुनगर पोलीस ठाण्यात गु. र. नंबर ५८/२०२५ अन्वये एनडीपीएस कायदा कलम ८(क), २०(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला पोलिसांच्या ताब्यात ठेवून पुढील तपास सुरू आहे. या यशस्वी कारवाईबद्दल अंमली पदार्थ विशेष पथकाचे स्थानिकांकडून कौतुक केले जात आहे. अशा धडक कारवायांमुळे गुन्हेगारी नियंत्रणात राहील अशी अपेक्षा आहे.

## राज्यात एकाच दिवशी दोन वाघांचा मृत्यू



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, नागपूर :** राज्यात वाघांच्या मृत्यूदरात झपाट्याने वाढ होत आहे. बुधवारी दोन वाघांच्या मृत्यूच्या घटना उघडकीस आल्या. वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर वनपरिक्षेत्राअंतर्गत गिरड सहवनक्षेत्रात समुद्रपूर–गिरड महामार्गावर धोंडगावजवळ पहाटेच्या सुमारास जड वाहनाच्या धडकेत चार महिन्याच्या मादी बछड्याचा मृत्यू झाला. तर पेंच व्याघ्रप्रकल्पातदेखील पश्चिम पेंचमध्ये नागलवाडी येथे आणखी एका वाघाच्या मृत्यूची घटना समोर आली. मृत वाघ जवळजवळ कुजलेल्या अवस्थेत असल्याने पेंच प्रशासनाच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राज्यात पहिल्यांदाच नवीन वर्षाच्या पहिल्या २२ दिवसात ११ वाघ मृत्युमुखी पडले आहेत. यातील दोन वाघांची शिकार झाली. दोन बछडे उपासमारीने मृत पावले आहेत. दोन वाघांचे मृत्यू संशयास्पद आहेत. दोन वाघ रेल्वे आणि रस्ते अपघातात मृत्युमुखी पडले. रेल्वे अपघातात वाघाचा मृत्यू होऊन काही तास उमटत नाही तोच रस्ते अपघातात देखील वाघ मृत्युमुखी पडला आहे. वाघांच्या मृत्यूची कारणे वेगवेगळी असून यातील बरेच मृत्यू हे वनक्षेत्राच्या बाहेर आहेत. वाघांच्या शिकारीचा धोका या मृत्यूतून समोर आला आहेच, पण वनक्षेत्राबाहेरील व्यवस्थापनात खाते कमी पडत असल्याचेही यातून दिसून आले आहे. मृतदेह कुजल्यानंतर वाघाचे मृत्यू समोर येत आहेत. त्यामुळे पर्यटन आणि तंत्रज्ञानावर भर देणाऱ्या खात्याची क्षेत्रीय स्तरावरील पकड कमी होत असल्याचे देखील या मृत्युसत्राने स्पष्ट केले आहे. सेवानिवृत्त अधिकारी आणि वाघांच्या कॉरिडॉर, त्यांच्या संवर्धनावर काम करणाऱ्या वन्यजीवप्रेमींनी देखील ही खंत बोलून दाखवली.

**वाघ कॉरिडॉर सुरक्षेचा मुद्दा दुर्लक्षित !**

वाघांच्या कॉरिडॉरची सुरक्षा हा मुद्दा आपल्याकडे अजूनही दुर्लक्षित केला जात आहे. प्रकल्प आणि इतर कारणांमुळे कॉरिडॉरचे जाळे तुटत चालले आहेत. तर रेषीय प्रकल्पांवरील शमन उपाययोजनांकडे होणारे दुर्लक्ष हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. ताडोबा परिसरात राष्ट्रीय हरित प्राधिकरणाच्या आदेशांकडे दुर्लक्ष केल्यामुळे वाघांना किंमत मोजावी लागत आहे.

**– मिलिंद परिवक्कम, रोडकिल्स इंडिया सिटीझन सायन्स कॅम्पेन**

## पराभूत उमेदवारांना समजावून सांगितली ईव्हीएम मेमरी तपासणीची प्रक्रिया

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीन संदर्भात आक्षेप नोंदवलेले पाच पराभूत उमेदवार व लोकसभेतील पराभूत उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रतिनिधींना मंगळवार (दि.२१) रोजी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मॉकपोल (ईव्हीएम मशीनची मेमरी तपासणी) प्रक्रिया समजावून सांगितली.

दरम्यान, ही पडताळणी म्हणजे मतमोजणीची फेरतपासणी असा अर्थसम जाणार्यांची यावेळी भ्रमनिरास झाला. अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील भाजपचे पराभूत उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी ४० ईव्हीएम मशीन संदर्भात निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. तर विधानसभा निवडणुकीतील दहा उमेदवारांनी पडताळणीसाठी अर्ज केला होता. यातील पाच उमेदवारांनी माघार घेतली असून पाचजणांचे पडताळणीसाठी अर्ज आहेत.

> ९ जणांची कोर्टात धाव डॉ. सुजय विखे पाटील, प्रा. राम शिंदे, बाळासाहेब थोरात, अभिषेक कळमकर, ऍड. प्रताप ढाकणे, प्राजक्त तनपुरे,अमित भांगरे, राणी लंके, संदिप वर्पे या नऊ जणांनी निवडणूक निकालाविरोधात कोर्टात धाव घेतलेली आहे.

यापैकी डॉ. विखे पाटील यांच्या प्रतिनिधीसह, राम शिंदे, ॲड. प्रताप ढाकणे, राणी लंके, राहुल जगताप आणि शंकरराव गडाख यांच्या प्रतिनिधी मंगळवारी मॉकपोल प्रक्रिया समजावून घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित होते. निवडणुकीची मतमोजणी झाल्यापासून सात दिवसांत दुसर्या किंवा तिसर्या क्रमांकावरील उमेदवारांना पाच टक्के ईव्हीएम मशीन पडताळणीसाठी अर्ज करता येतो. एका मशीनसाठी ४७ हजार २०० रुपये शुल्क भरावे लागते. कोणत्या उमेदवाराने निकालाला न्यायालयात आव्हान दिलेले नसेल, तर निकालाच्या ४५ दिवसांनी ईव्हीएमची पडताळणी केली जाते.

> कोर्टाच्या निकालानंतर त्यांचे मॉपकॉल निवडणूक आयोगाकडे अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी डॉ. सुजय विखे पाटील, प्रा. राम शिंदे प्रताप ढाकणे, राणी लंके यांनी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली आहे. त्यामुळे या चार उमेदवारांनी आक्षेप घेतलेल्या मशीनची पडताळणी न्यायालयाच्या आदेशानंतरच होणार आहे. तर राहुल जगताप आणि शंकरराव गडाख या उमेदवारांचे ईव्हीएम पडताळणीचे अर्ज कायम राहिले तर निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या तारखेला ईव्हीएम मशीनचे मॉपकॉल होणार आहे.

परंतु ९ उमेदवारांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये धाव घेत, निवडणूक याचिका सादर केल्या आहेत. मंगळवारी जिल्हा प्रशासनाच्यावतीने मॉपकॉल (ईव्हीएमची तपासणी) ची प्रक्रिया अर्ज केलेल्या निवडणूकीतील पराभूत उमेदवारांच्या प्रतिनिधींना समजावून सांगण्यात आली. मात्र, नेमकी कशाची तपासणी होणार आधी लक्षात न आलेल्या आणि प्रक्रिया समजावून सांगितल्यानंतर अनेकांचा भ्रमनिरास झाल्याचे चित्र मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात दिसून आले.

## पोलिसाला रिक्षासोबत फरफटत नेले, रिक्षाचालकाविरोधात गुन्हा दाखल

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, मुंबई :** मानखुर्द टी जंक्शन येथे पोलिसालाच रिक्षाचालकाने रिक्षासोबत फरफटत नेल्याचा गंभीर प्रकार घडला. या घटनेत पोलिसाच्या गुडघा व हाताला जखमा झाल्या आहेत.

त्यांना शताब्दी रुग्णालयात नेण्यात आले असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. आरोपी रिक्षाचालकाला पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला असता त्याने रिक्षा न थांबवता पोलिसाला फरफटत नेले. याप्रकरणी मानखुर्द पोलिसांनी आरोपी रिक्षाचालकाविरोधात सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.



तक्रारदार लक्ष्मण मधुकर मोझर (५०) नवी मुंबईतील रहिवासी असून ते सध्या पार्कसाईट पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. नाकाबंदीच्या कामासाठी मानखुर्द स्थानकाकडून आयओसी जंक्शनकडे जाणाऱ्या रस्त्यावर मंगळवारी ते तैनात होते. त्यावेळी त्यांनी तेथे एक रिक्षा येताना पाहिली. त्यांना संशय आल्यामुळे त्यांनी रिक्षाचालकाला रिक्षा थांबवण्याचा इशारा केला. पण रिक्षाचालक थांबला नाही.

त्यावेळी मोझर यांनी रिक्षा थांबवण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी रिक्षा पकडली असता आरोपीने थेट रिक्षाचा वेग वाढविला. काही अंतर तक्रारदार मोझर रिक्षासोबत फरफटत गेल्यानंतर त्यांची पकड सुटली आणि ते खाली कोसळले. यावेळी त्याच्या डाव्या गुडघ्याला व उजव्या कोपराला दुखापत झाली. त्यांना तातडीने शताब्दी रुग्णालयात नेण्यात आले. तेथे त्यांच्यावर उपचार करण्यात आले. या प्रकरणानंतर मोझर यांच्या तक्रारीवरून मानखुर्द पोलिसांनी आरोपी रिक्षाचालकाविरोधात सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, भरधाव वेगाने रिक्षा चालवणे व पोलिसाला जखमी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. सदर रिक्षाचालकाच्या रिक्षाचा क्रमांक पोलिसांना मिळाला असून त्याद्वारे पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

## नवी मुंबईतून महिनाभरात ११८ बांगलादेशी नागरिकांना अटक

**दि.२२, नवी मुंबई :** नवी मुंबईतील विविध २० पोलीस ठाण्यांमध्ये मागील महिन्याभरात ११८ बांगलादेशी नागरिकांना पोलीसांनी अटक केली आहे. यामध्ये ५६ महिला आणि ५७ पुरुष आणि पाच बालके आहेत.

संशयित बांगलादेशी नागरिकांनी सादर केलेल्या पुराव्यांची पडताळणी पोलीस अद्यापही संबंधित विभागाकडून करत आहेत. बांगलादेशी नागरिकांच्या अवैध वास्तव्यामुळे राज्य आणि देशावर होणारा परिणाम तसेच वाढत्या गुन्हेगारीमुळे सामान्य नागरिक त्रासले असून बांगलादेशींना पकडून त्यांना त्यांच्या देशात रवानगी करावी अशी मागणी विधिमंडळात भारतीय जनता पक्षाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती.



# संपादकीय

## यूजीसीच्या अधिसूचना...

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्रसिद्ध केलेल्या दोन अधिसूचनांची सध्या शिक्षणविश्वात चर्चा सुरू आहे. 'यूजीसी'कडून दिल्या जाणाऱ्या अनुदानासह काही विशेष सुविधा आणि महाविद्यालयांना स्वायत्ततेसारखे विशेषाधिकार प्राप्त करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी 'नवीन शैक्षणिक धोरणा'ची अंमलबजावणी कशी केली, याचे मूल्यमापन होईल, ही त्यातील पहिली.

मुळात राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद अर्थात 'नॅक'सारखी स्वतंत्र संस्था उच्च शिक्षण संस्थांच्या मूल्यांकनासाठी कार्यरत असताना, 'यूजीसी'ने मूल्यमापनासाठी अन्य काही निकष तयार करण्याचा प्रयत्न का करावा, असाच प्रश्न आहे. त्यामुळे याला विरोध होणार हे स्वाभाविक आहे. दुसरी अधिसूचना आहे, ती महाविद्यालये व विद्यापीठांतील प्राध्यापक भरती, पदोन्नती आणि विद्यापीठातील कुलगुरूंच्या निवडीच्या संदर्भात. या संदर्भात, नव्या अधिनियमांचा एक मसुदा तयार करण्यात आला आहे आणि या प्रस्तावित तरतुदींवर येत्या ५ फेब्रुवारीपर्यंत सूचना मागविण्यात आल्या असून, त्यांचा विचार करून या अधिनियमांना अंतिम स्वरूप दिले जाईल.

**प्राध्यापकपदासाठी नेट-सेट का आवश्यक?**

'यूजीसी'च्या या प्रस्तावित मसुद्यातील प्राध्यापक, प्राचार्य निवड-पदोन्नती आणि कुलगुरू नियुक्ती याबाबतच्या तरतुदी व्यवस्थितपणे अभ्यासाव्या लागणार आहेत. त्यात कंत्राटी प्राध्यापक नेमण्याच्या कमाल संख्येवरील, प्राध्यापकांच्या एकूण जागांपैकी १० टक्के, ही अट काढून टाकली आहे. म्हणजे आता जितक्या जागा रिक्त, तितके कंत्राटी प्राध्यापक नियुक्त करता येतील. कंत्राटी प्राध्यापक नेमल्यास त्याला सहायक प्राध्यापकाच्या एकूण वेतनाइतके वेतन देण्याबरोबरच ही नेमणूक फक्त एका शैक्षणिक सत्रासाठी असावी, असे नमूद आहे. या सत्रातील कामगिरीवरून पुढील आणखी एक सत्र ती वाढू शकते. हे धोरण अतिशय फसवे आहे. समजा, एका शैक्षणिक सत्रासाठी रिक्त जागांएवढे प्राध्यापक नियुक्त केले, ते सत्र संपल्यानंतर पुढील शैक्षणिक सत्रासाठी तेवढेच अन्य प्राध्यापक कंत्राटी पद्धतीने नियुक्त केले आणि पुन्हा पुढच्या सत्रासाठी, पहिल्या सत्रासाठी ज्यांना नियुक्त केले होते, त्यांना पुनर्नियुक्त केले आणि वर्षानुवर्षे हे असेच सुरू राहिले, तर काय? हे असे केल्याने नियमित प्राध्यापकांच्या जागा भराव्या न लागून त्यांना द्यावयाच्या लाभाचे पैसे वाचतील, असा तर हा विचार नाही ना, असा प्रश्न पडतो. यामुळे उच्च शिक्षणाचे आणखी खासगीकरण होऊ शकेल. सहायक प्राध्यापक नेमणुकीसाठी निकषांचे तीन पर्याय आहेत. पीएच.डी. वा नेट-सेट पात्रता हवी, असे पहिले दोन पर्याय आहेत. तिसरा पर्याय मात्र पदव्युत्तर पदवीला ५५ टक्के एवढी पात्रताही पुरेल, असे सांगतो. या प्रस्तावित अटींमुळे बरेच वादंग होत आहेत. चांगला शैक्षणिक दर्जा असलेल्या विद्यापीठातून ५५ टक्के गुणांनी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी आणि चांगला शैक्षणिक दर्जा नसलेल्या विद्यापीठातून ५५ टक्के गुणांनी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी यांच्यात समानता कशी राहील? त्याचप्रमाणे खासगी विद्यापीठे आणि शासकीय विद्यापीठे यांच्या पदव्युत्तर पदवीमध्ये साम्य कसे असेल? शिवाय, शिकविण्याचे कौशल्य, संवादकौशल्य याचाही प्राध्यापक निवडीत विचार केला पाहिजे. त्यांचा विचार अधिसूचनेत नाही. नेट-सेटची अट अत्यंत महत्त्वाची आहे. ती वगळू नये. पीएच.डी.बाबतीतही अनेक गैरप्रकार झालेले आहेत, होतात. अनेक विद्यापीठांमध्ये पीएच.डी. मिळविण्यात महिला विद्यार्थ्यांना त्रास होतो. अनेक विद्यापीठांमध्ये तर बोगस पद्धतीने पीएच.डी. दिलेल्या आहेत. प्राध्यापक भरतीच्या नव्या प्रस्तावित निकषांमधील एक चांगली तरतूद अशी की, योग, संगीत, ललितकला इत्यादी विषय शिकविण्यासाठी पदवीच्या जोडीने पाच वर्षांचा त्या क्षेत्रातील व्यावसायिक अनुभव, राज्य-राष्ट्रीय पातळीवरील उत्तम कामगिरी आणि विषय शिकविण्याची योग्य क्षमता एवढी पात्रता पुरणार आहेत. त्यामुळे या क्षेत्रांतील गुणवान मनुष्यबळ अध्यापनात आले, तर ते विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर असेल.

**कुलगुरू निवडीतील राजकीय हस्तक्षेप**

प्रस्तावित तरतुदींमधील कुलगुरू निवडीच्या निकषांवरून आणि पद्धतीवरून मात्र वादंग निर्माण होत असल्याचे दिसते. कुलगुरूपदी निवड करताना, त्यासाठी नेमायच्या शोध समितीचे अधिकार कुलपतींकडे देण्याचे प्रस्तावित आहे. कुलपती म्हणजे पर्यायाने राज्यपालांकडे अधिकार आणि राज्यपाल केंद्राने नेमलेले असल्याने कुलगुरू निवडीत थेट केंद्राचा राजकीय हस्तक्षेप होतील, असे वाटते. त्यामुळे या तरतुदीचे योग्य असे स्पष्टीकरण विद्यापीठ अनुदान आयोगाला द्यावे लागेल. पण, कुलगुरू निवडीतील राजकीय हस्तक्षेप हा विषय जुना आहे, तो आताच उपस्थित झाला आहे, असे नाही. यामुळे यापूर्वीही अनेक विद्यापीठांना अकार्यक्षम कुलगुरू मिळाले आहेत.

# 'स्व. बाळासाहेब ठाकरे' - असा नेता होणे नाही !


### २३ जानेवारी : हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे जयंती विशेष...

जो शून्यातून विश्व निर्माण करतो, इतिहासात त्याचेच नाव सोनेरी अक्षरांनी लिहिले जाते. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे हे असेच एक अजरामर व्यक्तिमत्व. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिवसेना या संघटनेची स्थापना केली. मराठीसह कट्टर हिंदू बांधवांना त्यांनी भगव्या झेंडयाखाली एकत्र केले. त्यांनी स्थापन केलेल्या पक्षामध्ये आज फूट पडली असली तरी बाळासाहेबांनी शिवसैनिकांना पाजलेले बाळकडू आज प्रत्येक शिवसैनिकाच्या रक्तामध्ये वहाते आहे, त्यामुळे महाराष्ट्रात जेव्हा केव्हा हिंदुत्वावर हल्ला केला जाईल, मराठी माणसाच्या न्यायहक्काचा प्रश्न निर्माण होईल तेव्हा त्याविरोधात दोन हात करण्यासाठी सज्ज राहणारा हा शिवसैनिकच असेल, मग भले तो आज अन्य कोणत्याही राजकीय पक्षात असेल. २३ जानेवारी हा बाळासाहेबांचा जन्मदिन. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत मराठी माणसांना अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचे पाहून त्यांचे रक्त सळसळले आणि शिवसेना या संघटनेची स्थापना करून त्यांनी मराठी माणसाचे स्फुलिंग चेतवले. मराठी माणसांना त्यांच्या न्याय हक्कासाठी लढण्यासाठी मानसिक बळ देण्याचे महत्कार्य त्यावेळी बाळासाहेबांनी केले. राज्यात मराठी आणि देशपातळीवर ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारा त्यांच्यासारखा एकही नेता ना कधी झाला ना भविष्यात कोणी होईल.

१९५० साली फ्री प्रेस जर्नल या नियतकालिकांच्या समूहामध्ये बाळासाहेब व्यंगचित्रकार म्हणून नोकरीला लागले. सामाजिक प्रश्नांना व्यंगचित्रांच्या माध्यमातून वाचा फोडण्याची त्यांची खुबी काही काळातच जनमाणसांना भावू लागली. सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांच्यासोबतही त्यांनी काम केले आहे, पुढे नोकरी सोडून त्यांनी १९६० मध्ये स्वतःचे मार्मिक हे साप्ताहिक सुरु केले. समाजात घडणाऱ्या घटनांवर ते व्यंगचित्रांच्या माध्यमातून भाष्य करू लागले. त्यावेळचे ते पहिले व्यंगचित्रात्मक साप्ताहिक होते. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊनही मुंबईत मराठी माणसांना दिली जाणारी सापत्न वागणूक त्यांना अस्वस्थ करत होती.

मराठी माणसांवर होणाऱ्या अत्याचारांना त्यांनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून वाचा फोडली. मराठी माणसांना त्यांच्या न्यायिक हक्कासाठी लढण्याची प्रेरणा बाळासाहेबांनी मार्मिकच्या माध्यमातून केली. अल्पावधीतच मार्मिकचा जसा खप वाढला तसा मराठी माणूस जागा होऊ लागला. महाराष्ट्रात राहून मराठी माणसाच्या हाताला रोजगार नव्हता, सामाजिक विषमतेला मराठी माणूस बळी पडत होता. मराठी माणसात अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची क्षमता आहे, मात्र त्याला कुशल नेतृत्व नसल्याने तो विखुरला गेला आहे हे लक्षात आल्यावर १९६६ मध्ये बाळासाहेबांनी शिवसेना या मराठी अस्मितेसाठी लढा देणाऱ्या संघटनेची स्थापना केली. ३० ऑक्टोबर १९६६ या दिवशी शिवसेनेचा पहिला मेळावा शिवाजी पार्क मैदानावर पार पडला ज्याला ५ लाखाहून अधिक मराठी माणसांनी हजेरी लावली होती. तेव्हापासून बाळासाहेबांचे नाव देशभरात प्रसिद्ध झाले. १९६६ पासून आजतागायत शिवाजी पार्कचा दसरा मेळावा आणि एकनिष्ठ मराठी माणसांची गर्दी हे समीकरण अबाधित राहिले आहे. आज बाळासाहेब आपल्यात नसले तरी शिवसेनेवर प्रेम करणारे संघटनानिष्ठ शिवसैनिक आजही जनमानसांत आहेत.

राज्य स्तरावर मराठी आणि राष्ट्रीय स्तरावर हिंदुत्व हे धोरण शिवसेनेने अवलंबले. मराठी माणसांना न्याय मिळवून देण्यासाठी राजकारणात प्रवेश करून सत्ताधाऱ्यांवर दबाव आणणे आवश्यक आहे हे ओळखून शिवसेनेने ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे सूत्र ठरवून राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच मुंबई महापालिकेची सत्ता हस्तगत केली. महापालिकेवर भगवा फडकला. तेव्हापासून मधला काही काळ वगळता मुंबई महापालिकेवर शिवसेनेचा भगवा सदैव डौलाने फडकत राहिला आहे. १९९५ साली भारतीय जनता पार्टीसोबत सोबत युती करून बाळासाहेबांनी मनोहर जोशींच्या रूपाने शिवसेनेचा पहिला मुख्यमंत्री राज्यावर बसवला. शिवसेनेच्या नेत्यांना लोकसभेच्या निवडणुकीत विजयी करून बाळासाहेबांनी काही खासदारही लोकसभेत पाठवले. १९८९ मध्ये बाळासाहेबांनी सामना हे शिवसेनेचे मुखपत्र म्हणून दैनिक सुरु केले.



महाराष्ट्रात राहून देशभरातील हिंदूंना त्याकाळी त्यांचा आधार होता. आज राम जन्मभूमी अयोध्येत उभे राहिलेले श्रीरामांचे भव्य मंदिर हे बाळासाहेबांचे स्वप्न होते. बाळासाहेबांच्या जयंतीच्या आदल्या दिवशी ते पूर्ण झाले. 'बाबरी मशीद जर माझ्या शिवसैनिकाने पाडली असेल, तर मला त्याचा अभिमान आहे' अशी स्पष्ट भूमिका घेऊन त्यांनी ज्वलंत हिंदुत्व म्हणजे काय असते हे हिंदुत्ववादी म्हणवून घेणाऱ्या आणि पक्षांना आणि संघटनांना त्यांनी दाखवून दिले होते. अमरनाथ यात्रा रोखू पहाणाऱ्या अतिरेक्यांना बाळासाहेबांनी मुंबईतून ठणकावल्यानंतर अतिरेकीही वरमले होते, एव्हढा दरारा त्यांनी निर्माण केला होता. देशावर प्रेम करणारा प्रत्येक मुसलमान माझा आहे असे म्हणून त्यांनी देशप्रेमी मुसलमानांनाही संरक्षण दिले होते. कोणत्याही राजकीय पदाचा मोह न बाळगणारे बाळासाहेब मातोश्रीवर येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांशी राजकारण सोडून बोलत होते. त्यामुळे दर्यादिल माणूस म्हणूनही त्यांची ख्याती आहे. १७ नोव्हेंबर २०१२ या दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या जाण्याने देशाच्या राजकारणात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. कोणाचीही भीडभाड न बाळगता आपल्या तत्वांशी एकनिष्ठ राहून राजकारण करणारा असा नेता पुन्हा होणे नाही

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## बाळासाहेब..

रे मराठी माणसाची
तुम्हां दैना पाहवेना
बाळ ठाकरे साहेब
स्थापिली शिवसेना

शिवबाचे अनुयायी
जाणले विचार धना
बॉम्बे जाहली मुंबई
जुळवले स्नेहबंधना

अठरा मावळ्यासह
रूजवलीस कल्पना
सतत संघर्ष चालला
संकटे येई अल्प ना

अटकेपार दुमदूमली
वीर वाघाची गर्जना
पर प्रांतीय हादरले
किंमत मराठीवजना

बाबरीमशीद दणका
सुरु होई राम वंदना
अयोध्येत रामआला
विसरेलं कोण चंदना

तया म्हणा पत्रकार
युध्दजिंके शस्त्रविना
थेट जाई काळजात
लाजवी कवी रवीना

पोचले कणा कणात
मित्र मुखपत्र सामना
हृदय स्पर्शी मार्मिक
पुरी जनसेवाकामना

हिंदूत्व खरी ओळख
कळे तुम्हां संवेदना
आपण आता नाहीत
मना जाळी हो वेदना


**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक... बातमी

# मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!

**आज २३ जानेवारी, हिंदू हृदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची ९९ वि जयंती. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले.**

प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी




माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली.

८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्रभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई - पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या जयंती दिनी महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## उद्योगसखी मनीषा वगरे २६ जानेवारीला दिल्ली येथे होणाऱ्या परेडसाठी निमंत्रित



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२२, संगमेश्वर (रत्नागिरी) :** प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी २०२५ रोजी दिल्ली येथे पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांच्या विशेष उपस्थितीत होणाऱ्या परेडला उपस्थित राहण्याचे अनेक लोकांचे स्वप्न असते. यावर्षी हा बहुमान साडवली गावची उद्योगसखी मनीषा अंकुश वगरे यांना मिळाला आहे. संगमेश्वर तालुक्यातील साडवली गावात राहणाऱ्या मनिषा अंकुश वगरे यांची प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथे होणाऱ्या परेड साठी विशेष अतिथी म्हणून निवड करण्यात आली आहे. प्रजासत्ताक दिन २०२५ करिता देशभरातून सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेल्या समुदाय संसाधन व्यक्ती (कृषिसखी, उद्योगसखी) व महिला स्वयंसहाय्यता समूह सदस्यांना त्यांच्या कुटुंबासमवेत कर्तव्यपथ नवी दिल्ली येथे विशेष अतिथी म्हणून आमंत्रित केले आहे. सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या मनिषा वगरे ह्या निवडप्रति अक्षराज मीडियाला प्रतिक्रिया देताना म्हणाल्या की सुरुवातीपासूनच आमची घरची परिस्थिती हालाखीची होती, परंतु उमेदच्या माध्यमातून मला काम करण्याची संधी मिळाली, आणि त्या संधीच सोन करण्याचं मी ठरवलं, आणि आज त्याची पोचपावती मला मिळाली. आमच्या साडवली गावच नाव दिल्लीपर्यंत पोचलं याचा मला सार्थ अभिमान आहे. आजपर्यंत कधीही दिल्ली पाहिली नव्हती, आपण कधी दिल्लीत जाऊ अस वाटलं नव्हतं, परंतु आज उमेद च्या माध्यमातून काम करताना आज ही संधी मिळाली त्याबद्दल मला खूप आनंद होत आहे. हे मी माझे भाग्यच समजते, आज इथपर्यंत पोचण्यासाठी मला माझे पती अंकुश वगरे, आई आक्काताई माने, वडील श्रीमंत माने, आणि भाऊ संजय आणि सुभाष माने तसेच माझे सर्व सहकारी, उमेदच्या सर्व महिला केडर कर्मचारी यांचे सर्वांचे सहकार्य लाभले असल्याचे त्यांनी सांगितले, ह्या निवड प्रति मनीषा वगरे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन सह शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## वयोश्री योजनेचे लाभार्थी 'लाभा'च्या प्रतिक्षेतच



**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.२२, पानगाव (लातूर) :** विधानसभा निवडणुकीच्या अगोदर महाराष्ट्र सरकार ने अनेक योजना जाहीर केल्या होत्या त्यात तीर्थ स्थळ योजना, मुखमंत्री युवा कार्य योजना, लाडकी बहिण योजना, तसेच जेष्ठ नागरिकांन साठी वयोश्री योजना महाराष्ट्र सरकार ने जाहीर केली. या योजने मुळे जेष्ठ नागरिकांना चष्मा, काठी व जेष्ठ नागरिकांना उपयोगी होणारे साहित्य घेण्यासाठी मदत या योजनेची मदत होणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या अगोदर. ग्रामपंचायत, मध्ये लेखी स्वरूपात फॉम भरून घेतले होते आणि जे लाभार्थी या योजने साठी पात्र ठरतील त्याच्या आधार संलग्न खात्यावर लाभा ची रक्कम जमा होणार असल्या चे सरकार कडून सांगण्यात आले होते.

परंतु विधानसभा निवडणू झाल्या नंतर शपत विधी च्या अगोदर च्या भाषणा मध्ये मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी महायुती सरकार ने जाहीर केलेल्या सर्व योजना आम्ही सुरु ठेवणार आहोत असे सांगण्यात आले होते. परंतु सरकारला जेष्ठ नागरिकांचा विसर पडला का? असा प्रश्न जेष्ठ नागरिकां कडून विचारला जातोय.

वयोशी योजने मुळे जेष्ठ नागरिकांना थोडी फार तरी आर्थिक मदत होणार आहे. निवडणुक झाली निकाल सुद्धा लागला मुख्यमंत्री पदाची निवड सुद्धा झाली असून आता तरी सरकारने जेष्ठ नागरिकांन साठी च्या योजनेच्या लाभार्थी चा विचार करावा हिच अपेक्षा जेष्ठ नागरिक करीत आहेत.

## कायदे हे नागरिकांच्या सुरक्षेसाठीच - सुरेश थोरात



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२१ पालम (परभणी) :** कायदे नागरिकांच्या सुरक्षेसाठीच असून त्यांनी कायद्याचे पालन करून प्रतिष्ठिचे जीवन जगावे असे प्रतिपादन पालम पोलिस स्टेशन चे पोलीस निरीक्षक सुरेश थोरात यांनी केले. ते जवळा येथे माधवराव पाटील महाविद्यालयाच्या वतीने सुरु असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या च्या शिबिरात बोलत होते. रस्ते अपघातात अनेक तरुण मृत्युमुखी पडत असून असे अकाली जाणे समाजाची हानी असून तरुणांनी वाहन परवाना असल्याशिवाय वाहन चालवू नये तसेच वाहन चालवतांना वेगावर नियंत्रण ठेवावे. पोलीस समाजाचा मित्र असून त्यांना सहकार्य केल्यास अनेक प्रश्न सुटण्यास मदत होते असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यक्रमधिकारी डॉ. एम. एम. डमरे होते. प्रमुख पाहुणे पी.एस.आय. विश्वम्भर कऱ्हाळे, बालाजी मोठे, स्थानिक गुन्हे शाखेचे बाबाराव बेद्रे उपस्थित होते. सूत्रसंचालन कु. पूजा परडे हिने तर आभार प्रदर्शन डॉ. व्ही. एफ. दाभाडे यांनी केले. यावेळी महाविद्यालायचे प्राध्यापक, विध्यार्थी व ग्रामस्थ मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## जि.प. शाळा चिरली येथे बाल आनंद मेळावा साजरा

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२२, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी पासून जवळ अंतरावर असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिरली येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक विभाग अंतर्गत बाल आनंद मेळावा साजरा करण्यात आला. या मेळाव्याचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष केशव पाटील बोंबले व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या हस्ते करण्यात आले. या मेळाव्यात शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या घरातून खमंग, चवदार, चटकदार मिष्ठाण पदार्थ बनवून आणून शाळेच्या प्रांगणात भव्य दिव्य असे स्टॉल्स मांडले. या मेळाव्याचा आनंद लुटण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका नीता दमकोंडवार (दरबस्तेवार) यांनी आजूबाजूला असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी, पिंपळगाव येथील विद्यार्थी व शिक्षकांना या मेळाव्याचे आनंद लुटण्यासाठी निमंत्रित केले होते. यासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक व पालक प्रतिनिधी म्हणून अशोक ढगे, दीपक ढगे, शैलेंद्र ढगे, नागेश ढगे, दिगांबर धुप्पे, व्यंकटरमण मिरासे, गंगाधरराव धुप्पे, पवन ढगे यांच्या सह पिंपळगाव येथील शिक्षक पवन गड्डवार, आंबटवार सर, भाग्यश्री गोस्के, टाकळी येथील मुख्याध्यापक बन्नारे सर यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसह आनंद मेळाव्यास हजेरी लावली.

# शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांना शासन निर्णयात घेवू - महमुलमंत्री बावनकुळे

**अक्षराज : राजकूमार इकडे**

**दि.२२, सुपा (अहिल्यानगर) :** राज्यात शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसोबत शेतरस्त्यांचा प्रश्न ज्वलंत बनत चालला अजुन या प्रश्नावर महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे व राज्य समन्वयक दादा साहेब जंगले पाटील यांनी शेतरस्त्यांच्या प्रश्नाकडे सरकार प्रशासणाचे लक्ष वेधण्यासाठी राज्यभर विविध ऐतिहासिक आंदोलनाच्या माध्यमातून न्यायालयीन लढा देत जनजागृती करत सरकारसोबत पत्रव्यवहार करत संवाद साधण्याचे काम सुरू असताना महसुलमंत्री चंदशेखर बावनकुळे यांनीही विषयाला न्याय देण्याची भूमिका घेतल्यामुळे महराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी मुंबई मंत्रालय येथे मंत्री बावनकुळे साहेब यांना शासननिर्णयाच्या त्रुटी व मुद्दे या विषयावर निवेदन देत चर्चा केली असता मंत्री बावनकुळे साहेब यांनी संबंधीत अधिकाऱ्यांकडे मागण्यांचे निवेदन देत याम धील मुद्दे शासन निर्णयात घेण्याच्या सुचना दिल्या सोबतच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांनाही निवेदन दिले असताना त्यांनीही संबंधित विभागांना तातडीने लक्ष घालुन प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले निवेदनात राज्यातील सर्व शिव पानंद शेतरस्त्यांच्या



हद्द निश्चिती करून दर्जेदार शेतरस्ते करा, तहसिल कार्यालयांतील प्रलंबित शेतरस्ता केसेस तातडीने निकाली काढा, ग्रामशेतरस्ता समित्या स्थापनेचे आदेश तातडीने देवून त्यांचा अहवाल घेवून कार्यवाही करावी, वहिवाटीच्या रस्त्यांचे सर्वेक्षण करून नकाशावर घ्यावेत, शेतरस्त्यांना नंबरी लावुन त्यांचे सर्वेक्षण करावे व नंबरी हवणारांना दंडात्मक कारवाई करावी, मा.उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर दाखल याचिका क्रं.८२८७/२०२३ रोजीच्या निकालानुसार राज्यातील सर्व तहसिल कार्यालयांना ६० दिवसांच्या आत

> समृद्ध महाराष्ट्रासाठी शेतकरी समृद्ध व्हावा या उद्देशाने प्रत्येक सरकारने शासन निर्णय बनवले परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यास आपण कुठेतरी कमी पडलो त्यामुळेच शेतकऱ्यांचा पिढ्यानपिढ्या शेतरस्त्यांसाठी प्रशासकीय न्यायालयीन संघर्ष सुरूच आहे त्यामुळे त्यांचे शारीरिक मानसिक आरोग्य धोक्यात आल्यामुळे त्यांना न्याय मिळून देण्यासाठी शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून शेवटच्या शेतकऱ्याला दर्जेदार शेतरस्ता मिळवून देण्यासाठी राज्यव्यापी लढा सुरू केला आहे.
>
> **– शरद पवळे/ दादासाहेब जंगले पाटील**
> **(महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळ)**

शेतरस्ते खुले करण्याचे आदेश द्यावेत, नकाशावरील शासकीय शेतरस्त्यांना वादी म्हणून सरकारचा प्रतिनीधी असावा, वाटपत्रात शेतरसत्याचा उल्लेख झाल्याशिवाय वाटपत्र करू नये, शेतरस्त्या अभावी पडीक राहणाऱ्या जमिनधारकांना विनाअट नुकसान भरपाई द्यावी अशा विविध मागण्या शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी चळवळीच्या माध्यमातून राज्य मंत्र्याकडे केल्या आहेत.

# श्री रासाईदेवी मित्र मंडळाचे वार्षिक संमेलन, हळदी कुंकू सोहळा संपन्न

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२२, दहिसर (मुंबई) :** गेली १५ वर्षे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लांजा तालुक्यातील कुवे (मावळतवाडी) येथील उपरोक्त मंडळातर्फे वार्षिक स्नेहसंमेलन व महिलांसाठी हळदी कुंकू समारंभ रविवार दि.१९ जानेवारी २०२५ रोजी, ज्ञानेश्वर नगर सांस्कृतिक केंद्र, दहिसर (पूर्व) येथे पार पडले.



कौटुंबिक उदरनिर्वाह करण्याकरिता मुंबईत असलेल्या सदर गावच्या ग्रामस्थ व मुंबईकर यांच्या एकजुटीच्या बांधिलकीने विस्तारित झालेल्या श्री रासाईदेवी मित्र मंडळ,व महिला मंडळ सातत्याने वाडीच्या सर्वांगीण विकासात्मक कामात एकत्रित येऊन असे उपक्रम घेत असतात.कला, क्रिडा, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्य क्षेत्रात मंडळ वर्षेभरात विविध उपक्रम घेत असते. मंडळाचा आगामी उपक्रम नेत्र तपासणी शिबीर व आरोग्य रक्तदान शिबीर असल्याचे कार्यक्रमात जाहीर करण्यात आले. सदर सोहळ्याच्या निमित्ताने लहान मुलाचे सांस्कृतिक कार्यक्रम, अन्य खेळ,लहान विद्यार्थ्यांना खाऊ वाटप, शालेय विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, महिलांसाठी हळदी कुंकू, मानाची साडी (लकी ड्रॉ), महिलांचे सामूहिक नृत्य व मंगळागौर आदी भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाला सुनिल डावळ (आयोजक/सामाजिक कार्यकर्ता) व दीपक कारकर (पत्रकार) यांची विशेष उपस्थिती होती. दरम्यान व्यासपीठावर मंडळाचे प्रमुख सल्लागार दत्ताराम नेमण, अध्यक्ष - अनंत नेमण, उपाध्यक्ष - संतोष पालकर, सचिव - विनायक सावंत,सहसचिव - गणपत नेमण, खजिनदार - मंगेश वाडकर, सहखजिनदार - बाळकृष्ण नेमण तसेच सल्लागार प्रकाश वाडकर, विजय जोशी, सुरेश गोरे, संजय सावंत, विलास सावंत मंडळाची महिला कार्यकारिणी प्रणाली वाडकर, सुजाता नेमण, अश्विनी नेमण, वैशाली सावंत, निशा वाडकर, स्वाती गोरे तसेच श्री रासाईदेवी मित्र मंडळाचे सर्व सभासद युवा कार्यकर्ते व महिला कार्यकर्त्या मोठया संख्येने उपस्थिती होत्या.

श्री रासाईदेवी मित्र मंडळातर्फे उपस्थिती मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. मान्यवर व मंडळाचे सदस्य यांनी कार्यक्रमातून उपस्थितांना मार्गदर्शन केले. देशाचं उद्याचं भवितव्य असणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचे भेटवस्तू देत कौतुक केले. अतिशय नेत्रदीपक आयोजनात पार पडलेला सोहळा एक आगळीक निर्माण करणारा होता. सदर सोहळ्याचे अभिनंदनासह कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक सावंत,प्रकाश वाडकर यांनी केले. तर आभारप्रदर्शन गणपत नेमण यांनी केले.

# काकरा कुळपरिवार मेळाव्यात 'आदिवासी संस्कृतीचे' दर्शन

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.२०, जव्हार (पालघर) :** सध्याच्या आधुनिकतेच्या काळात सोशल मीडियाच्या माध्यमातून जरी नातेसंबंध जवळ येत असली तरी ती नाती आधिक वृद्धिंगत करण्यासाठी प्रत्यक्ष भेटी ह्या दुरावल्या जात असल्याचे दिसत आहे.

धावपळीचे जीवन जगतांना दिवसभर जो-तो आपल्या कामात व्यस्त असल्यामुळे प्रत्यक्ष भेटीगाठी होत नाहीत आणि यामुळे नातेसंबंध जपण्यासाठी काकरा, काकवा व काकरे कुळपरिवाराचा मेळावा डहाणूच्या म्हसाड येथे सेवानिवृत्त सैनिक शांताराम काकरा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

या मेळाव्यात डहाणू, जव्हार, विक्रमगड, वाडा, गुजरात, दादरा नगर हवेली, ठाणे, बदलापूर या ठिकाणाहून हजारोंच्या संख्येने कुळपरिवारातील सदस्यांनी आपली उपस्थिती लावली होती. या मेळाव्यात आदिवासी समाजाची ओळख असलेल्या तारपा नृत्य, तुर नृत्य (स्थानिक भाषेत ढुमशा) अशा पारंपारिक नृत्यांचे सादरीकरण करून आजही हा समाज आपल्या चालीरीती व परंपरा जोपासताना दिसून येत आहे. मेळाव्यात उपस्थित परिवारातील सदस्यांनी या नृत्यांवर ठेका धरतांना पहावयास मिळाले.



मेळाव्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले सुप्रसिद्ध डॉ. राज पाटील यांनी परिवाराला मार्गदर्शन करतांना काकरा परिवाराचे व आपले जुने नाते संबंध असून ते मी शेवटपर्यंत जोपासणार असल्याची त्यांनी ग्वाही दिली. तर मेळावाच्या अध्यक्षांनी परिवाराला संबोधित करताना आपल्या मनोगतात काकरा, काकवा आणि काकरे हा एकच जनसमुदाय असून आपल्या पूर्वजांच्या अशिक्षित पणाचा गैरफायदा घेत नोंदी करतांना त्यावेळी झालेल्या चुकांमुळे आज या नावांमध्ये बदल असल्याचे त्यांनी ठासून सांगितले.

विशेष म्हणजे कुळपरिवारातील स्वाती काकरा हिने जिम्नॅस्टिक या क्रीडा प्रकारात आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवून दक्षिण कोरिया येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले होते. त्यामुळे स्वाती हिचा या मेळाव्यात परिवारामार्फत विशेष सन्मान करण्यात आला. परिवारातील सुप्रसिद्ध यु-ट्युब कलाकार नैनिता काकरा हिचा देखील सन्मान करून तिला गौरविण्यात आले. या मेळाव्याला सुप्रसिद्ध डॉ. कांता काकरा यांची उपस्थिती लक्षणीय ठरली. मेळाव्याचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन लखमा काकरा यांनी यशस्वीरित्या पार पाडले.

# अतिक्रमण विभागामार्फत कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२१, कोपरखैरणे (नवी मुंबई) :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत १) प्रताप अशोक माने/ राजश्री प्रताप माने, रूम नं.१००७, सेक्टर-७, कोपरखैरणे, २) शंकर नामदेव शेवाळे, रूम नं.१०११, से.७, कोपरखैरणे, ३) गोविंद देवजी सकपाळ, रूम नं.१००९, से.७, कोपरखैरणे, ४) सुरेश रामचंद्र अनुसे, रूम नं.१०१०, से.७, कोपरखैरणे, ५) कुंदा प्रकाश शिंदे, रूम नं.१००८, से.७, नवी मुंबई यांच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. सदर बांधकामावर तोडक कार्यवाही करण्यात आली.

सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाचे सहा.आयुक्त सुनिल काठोळे, चंद्रकांत धोत्रे कनिष्ठ अभियंता व इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. मुख्यालय स्तरावरून पोलिस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यात आलेला होता. तसेच सदर कारवाईसाठी ०९ मजूर, इलेक्ट्रॉनिक हॅमर - ०२, गॅस कटर - ०१, पिकअप व्हॅन - ०१ वापर करण्यात आले.

तसेच महापे कार्यक्षेत्रातील शाळा परिसराजवळ १०० मीटरच्या आत सिगारेट/गुटखा विक्री करणाऱ्या ०४ दुकानदार १) सुभाष महेंद्र नायक (ज्योती पान शॉप) २) अरूणकुमार दासार (बालाजी पान शॉप) ३) रामेश्वर त्रिपाठी (रामेश्वर शॉप) ४) हौसला त्रिपाठी (त्रिपाठी पान शॉप) यांचे दुकानांवर कारवाई करून त्यांचे सामान जप्त करून डंपिंग येथे जमा करण्यात आले.

# केईएम हॉस्पिटल म्हणजे मुंबईकरांच्या अविरत रुग्णसेवेचा आधारवड - उपमुख्यमंत्री शिंदे

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२२, मुंबई :** अविरत रुग्णसेवेची १०० वर्ष पूर्ण करणाऱ्या आणि लाखो रुग्णांना जीवनदान देणाऱ्या केईएम रुग्णालयाच्या चरणी मी नतमस्तक होतो, अशी भावना उपमुख्यमंत्री .शिंदे यांनी आज केईएम रुग्णालयाच्या शतक महोत्सवी समारंभात व्यक्त केली. सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय आणि केईएम रुग्णालयाच्या ९९ वा वर्धापन दिन सोहळा रुग्णालयाच्या प्रांगणात झाला. त्यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आमदार कालिदास कोळंबकर, सुनील शिंदे, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त विपिन शर्मा, केईएमच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले की, केईएम ने घेतलेले रुग्णसेवेचे व्रत अवघड आहे. आजही इथली रुग्णसेवा अहोरात्र चालू आहे. इथल्या डॉक्टरांचे, नर्सेसचे, कर्मचाऱ्यांचे आभार मानावे तेवढे कमी आहेत. तुम्ही आहात, म्हणून सामान्य मुंबईकर आज जगतो आहे, असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले.सेवाभाव हा परमभाव आहे, असे आपली संस्कृती सांगते. डॉक्टर देखील वैद्यकीय क्षेत्रात येताना सेवा धर्माची शपथ घेतात. ही शपथ घेऊनच ९९ वर्षांपूर्वी हे हॉस्पिटल उभे राहिले. आजही मुंबई आणि आसपासच्या रहिवाशांना आधार देत उभे आहे, असेही शिंदे यावेळी म्हणाले. घरातल्या आधारवडा सारख्या बुजुर्ग व्यक्ती बद्दल आपल्याला आदरभाव असतो. आपुलकी असते, तशीच भावना केईएम बद्दल आहे. एखाद्या आरोग्य क्षेत्रातील संस्थेनं सुवर्ण किंवा शताब्दी महोत्सव साजरा करणे ही त्या संस्थेसाठी अभिमानास्पद बाब असते. आज केईएम रुग्णालय हे देशातील सर्वोत्तम रुग्णालयांपैकी एक आहे. केईएम हे कुटुंब आहे. त्यामध्ये प्रत्येक व्यक्तीची काळजी घेतली जाते.

सांस्कृतिक वारसा जपत अत्याधुनिकतेची कास देखील केईएमने धरली आहे. आरोग्य क्षेत्राच्या नव्या दिशा आणि आंतरराष्ट्रीय मानके केईएमने स्थापित केली असल्याचे त्यांनी सांगितले. केईएम सारखी रुग्णालये ही सर्वसामान्यांसाठी देवदूता सारखी आहेत. अरुणा शानबाग यांची ४१ वर्षे सेवा केईएमच्या कर्मचाऱ्यांनी केली. जगातल्या कुठल्याही हॉस्पिटलमध्ये रुग्णसेवेचे असे उदाहरण नसेल. केइएमसोबत नाव येते ते जीएस वैद्यकीय महाविद्यालयाचे कितीतरी नामवंत, दिग्गज डॉक्टर या कॉलेजच्या प्रांगणात तयार झाले. इथल्या डॉक्टरांची संशोधकांची कीर्ती जगभर पसरलेली असल्याचे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी काढले.हॉस्पिटलच्या आजवरच्या आरोग्य सेवेबाबत बोलताना



ते म्हणाले की, भारतातील पहिली हृदय शस्त्रक्रिया केईएम रुग्णालयात १९६८ मध्ये झाली. त्यानंतर २०२४ रोजी यशस्वी हार्ट ट्रान्सप्लाण्ट येथे करण्यात आले. अवयवदाना मध्ये वाखाणण्यासारखे कार्य केल्याबद्दल केईएम रुग्णालयाचा काही दिवसांपूर्वीच दिल्लीत गौरव करण्यात आला. भारतातील पहिली टेस्ट ट्युब बेबीही केईएम रुग्णालयात १९८७ साली डॉ. इंदिरा हिंदुजा यांनी घडवली आणि आता इथे रोबोट या अत्याधुनिक तंत्रज्ञाना मार्फत गुडघ्याच्या सांधे बद्दल शस्त्रक्रिया करण्यात येतात. वैद्यकीय क्षेत्रात केईएमने केलेली ही क्रांती ऐतिहासिक असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दरम्यान केईएमच्या शताब्दी महोत्सवानिमित्त महानायक अमिताभ बच्चन यांच्या हस्ते फॅटी लिव्हरवरील उपचाराच्या क्लिनीकचे देखील उद्घाटन झाले. ते या आजाराच्या जनजागृतीसाठी ब्रॅण्ड अम्बॅसिडर म्हणून काम करणार आहेत.त्याबद्दल अमिताभ बच्चन यांचे शासनाच्यावतीने आभार मानतो. केईएमचे शताब्दी महोत्सव वर्षे पुढील पिढीसाठी खुप काही देण्यासाठी पायाभरणीचे ठरेल, यात तीळमात्र शंका नाही, असेही ते म्हणाले.तसेच रुग्णालयात झिरो प्रिस्किप्शन पॉलिसी देखील लागू करावी आणि त्याचबरोबर रुग्णांना कोणत्याही परिस्थितीत जागा कमी पडू नये यासाठी शताब्दी महोत्सवी वर्षात आयुष्मान टॉवर उभे करतानाच रुग्णाच्या नातेवाईकांची परवड होऊ नये. यासाठी व्यवस्था निर्माण करण्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी निर्देश दिले. याठिकाणी डॉक्टरांचे देखील म्युझियम करण्यात यावे अशी महत्वपूर्ण सूचनाही त्यांनी यावेळी केली.याच दरम्यान उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्मरणिकेचे आणि वार्षिक अहवालाचे प्रकाशन करण्यात आले.या कार्यक्रमाची सुरुवात राज्य गीताने तर समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

# परीक्षेच्या काळात आहार कसा आसावा - ज्योती येणारे (योगशिक्षिका)

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२२, सुपा (अहिल्यानगर) :** परीक्षेच्या काळात आहार कसा घ्यावा आणि आपले मानसिक संतुलन चे नियोजन कसे करावे. ह्या बद्दल आहारतज्ञ ज्योती येणारे ह्यांनी बुधवार, दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी अहिल्यानगर येथील जिल्हा मराठा प्रसारक समाजाचे रेसिडेन्सीअल माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये मार्गदर्शन केले.

त्या बोलताना विद्यार्थांना सांगत होत्या की, जीवनामध्ये यशस्वी व्हायचं असेल तर आपले वेळापत्रक हे आपणच तयार करायचे आहे त्यांनी सांगताना सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत तुम्ही तुमच्या खाण्यापिण्याची आणि अभ्यासाची नियोजन कसे केले पाहिजे त्याबद्दल मार्गदर्शन केले.जसा तुम्ही आहार घेणार तसे तुमचे विचार असणार परीक्षेच्या काळात सात्विक आहार घेणे गरजेचे असते त्याच



बरोबरीने ताजी फळं, हिरव्या पालेभाज्या आणि ड्रायफ्रुट्स हे घेतली पाहिजे. परीक्षेच्या काळात गोड पदार्थ पूर्ण टाळावीत कारण अभ्यास करताना आपल्याला झोप येते, चहा, कॉफी पिऊ नये. त्यामुळे पित वाढते रात्री ७ च्या आत जेवण करावे. पाणी भरपूर पिणे उपाशी पोटी अभ्यास करू नये. रात्रीचे जागरण न करता सकाळी पहाटे उठून अभ्यास करावा. कष्ट करण्याची तयारी आणि प्रामाणिकता त्याच बरोबरीने जिद्द चिकाटी हेच यशस्वी होण्याची खरी गुरुकुल्ली आहे. हा त्यांचा फॉर्म्युला त्यांनी सांगितला येत नाही. म्हणून सोडून देऊ नका. जगाच्या पाठीवर कोणतीच गोष्ट अशक्य नसते. सकाळी लवकर उठणे, प्राणायाम करणे, फक्त अर्धा तास व्यायाम करणे व वेळेचे नियोजन करणे आणि रोजच्या रोज व्यायाम करणे. हे आपल्या दिवसभराचे टॉनिक असते. नियोजेन करून जर अभ्यास केला तर ऐन परीक्षेच्या काळात आपला गोंधळ उडणार नाही. त्याच बरोबरीने आपल्या आत्मविश्वास कसा वाढवायचा, रोजच्या दिनचर्या मध्ये किती वेळ अभ्यास करायचा हे ही आहारतज्ञ ज्योती येणारे यांनी सांगितले. जीवन बळजबरीने न जगता आनंदाने जागा असे त्या म्हणाल्या.

# लठ्ठपणामुळे अनेक गंभीर आजारांना निमंत्रण - डॉ.पाटील

## साई सावली हॉस्पिटलमध्ये तज्ज्ञांचे मोफत उपचार व मार्गदर्शन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** बदलती जीवनशैली, व्यायामाचा अभाव आदी कारणांमुळे लठ्ठपणा समस्या अनेकांना भेडसावत आहेत. लठ्ठपणामुळे अनेक काही प्रकारच्या गंभीर विकार होण्याची शक्यता असते. या समस्येवर मात करण्यासाठी काही जण सर्जरी करून घेतात. मात्र, त्यापेक्षा ही समस्याच उद्भवू नये.

यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन व उपचारांची गरज असल्याचे मत रुबी हॉल क्लिनिक पुणे तज्ज्ञ डॉ.केदार पाटील यांनी व्यक्त केले. पारनेर तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथे रुबी हॉल क्लिनिक पुणे व साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिर प्रसंगी ग्रामीण भागातील पोटाच्या समस्या, लठ्ठपणा, हार्निया, अपेंडिक्स, वजन कमी, चरबी कमी करण्यासंदर्भातील रुग्णांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

पुढे म्हणाले, की पूर्वी जाडजूड व्यक्तीमत्वाला निरोगी, सुखवस्तू आणि धडधाकट आहे, असे समजले जायचे. मात्र, आता ही व्याख्या बदलू पाहत आहे. कारण जीवनशैली बदलानुसार स्थूलता (लठ्ठपणा) सर्वच वयोगटात वाढत असून तो अनेक आजारांना निमंत्रण देणारी जननी ठरत आहे. मुलांमध्येही प्रमाण वाढत असल्याने या लठ्ठपणाला वेळीच ओळखून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी



लठ्ठपणा त्याची कारणे, तोटे, त्यामुळे जडणारे आजार व उपचार, मुळात ही समस्या उद्भवू नये. यासाठी काळजी घेण्याची गरज असल्याचे मत डॉ.केदार पाटील यांनी व्यक्त केले.

यាप्रसंगी रुबी हॉल क्लिनिकच्या तज्ज्ञ डॉ.केदार पाटील, डॉ.आनंद काटकर, योगेश लेकावळे, अमोल पंडित, साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे सर्व संचालक,साई सावली हॉस्पिटलचे चेअरमन डॉ.भाऊसाहेब खिलारी, डॉ.अश्विन खंडारे उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी सुधीर जासूद, गणेश गायकवाड, जयेश झावरे, प्रसाद सोनावळे व साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आता पत्रकारांना मिळणार २० हजार रुपये निवृत्तीवेतन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२२, विंचूर (नाशिक) :** सेवानिवृत्तीनंतर पत्रकारांना मिळणारे मानधन ११ हजार रुपयांवरून २० हजार रुपये करण्यासंदर्भात शासनाने घोषणा केली होती. मात्र, त्याची अंमलबजावणी होत नव्हती. 'व्हॉईस ऑफ मीडिया' ने या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी आज या फाईलला मंजुरी दिली असून, येत्या एप्रिलपासून पत्रकारांना २० हजार रुपये मानधन देण्याचे निश्चित केले आहे.

शासनाने यापूर्वी सेवानिवृत्त पत्रकार यांना मानधन वाढीची घोषणा केली होती. मात्र,ती अंमलात येण्यासाठी निधीची तरतूद केली जात नव्हती. 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या मागणीनंतर तत्कालीन मंत्री शंभूराजे देसाई यांनी दस्तावेज तयार करून तो वित्त व नियोजन विभागाकडे पाठवला होता. याला एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाला, तरी निर्णय होऊ शकला नव्हता. आज उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजितदादा पवार यांनी पत्रकारांच्या मानधनासाठी ५० कोटींची तरतूद केल्याचे जाहीर केले.

आता येत्या महिन्यापासून २०० पात्र पत्रकारांना या वाढीव मानधनाचा लाभ मिळेल. अनेक वेळा सरकार आश्वासन देते, पण त्याची अंमलबजावणी होत नाही. मात्र, यावेळी अजितदादांनी दिलेला शब्द पाळला आहे. याबद्दल 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.'व्हॉईस ऑफ मीडिया' च्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# थोडक्यात

## कॅडबरी सिग्नल येथे कंटेनर पलटी

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**



**दि.२२, कॅडबरी सिग्नल (ठाणे) :** कॅडबरी सिग्नल जवळ घोडबंदरला जाण्याकरिता यु टर्न घेत असताना ड्रायव्हरचा अंदाज चुकला व कंटेनर पलटी झाला. त्यामुळे काही काळ तेथे वाहतुकीची कोंडी झाली होती. सदर दुर्घटना बुधवार, दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२ ते १ वाजताच्या दरम्यान घडली. कॅडबरी सिग्नल ला वारंवार अशा दुर्घटना घडत असतात. जानेवारी महिन्यातील ही या ठिकाणची दुसरी दुर्घटना आहे. अपघाताची माहिती मिळताच महानगर पालिका आपत्ती विभागाचे कर्मचारी सुद्धा घटना स्थळी पोहचले. त्यांनी त्वरित कंटेनर वेगळा करून बाजूला घेतला व वाहतूक सुरळीत केली. याप्रसंगी त्यांना वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची मदत झाली. सदर अपघातात कोणतीही जीवित हानी झालेली नाही.

## गटविकास अधिकारी बळवंत यांचे शेतकऱ्यांना थेट आवाहन - दलालांपासून सावध रहा

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.२२, हदगाव (नांदेड) :** पंचायत समिती हदगाव अंतर्गत शेतकऱ्यांसाठी विविध योजनांचा, शेड, गाय गोठा रोजगार हमी योजनेअंतर्गत अनेक योजना आहेत. शासनाने उपलब्ध करून दिलेल्या आहेत. परंतु शेतकऱ्यांना दलालांकडून होणाऱ्या फसवणुकीपासून वाचवण्यासाठी गट विकास अधिकारी, बळवंत यांनी सर्व घरकुल लाभार्थ्यांना विहिरी शेड, असे अनेक प्रकारच्या योजनांसाठी आपल्या ग्रामविकास अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे थेट आवाहन केले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, शेतकऱ्यांनी कोणत्याही दलालांचा आधार घेऊ नये अन्यथा पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. गट विकास अधिकारी बळवंत यांनी शेतकऱ्यांना सांगितले की, शेतकऱ्यांचा प्राथमिकता आहे. कोणत्याही योजना असो तळागाळापर्यंत पुरवणे हे आमची जबाबदारी आहे आणि शेतकऱ्यांनी कोणत्याही फसव्या मध्यस्थांवर अवलंबून राहू नये. फाईल प्रक्रिया, कागदपत्रांच्या अडचणींसाठी थेट ग्रामविकास अधिकाऱ्याशी संपर्क साधा. दलालांना पैसे देऊन नये अन्यथा दलाला ना मिळवण्याचा प्रयत्न केल्यास नुकसान शेतकऱ्यांचेच होईल असे पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना ठामपणे सांगितले आहे.

## महिला व किशोर गट जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा २०२५

**अक्षराज : संदिप येवले**



**दि.२२, मुंबई :** वीर नेताजी मंडळ, संस्कृती प्रतिष्ठान, रणाझुंझार मंडळ यांनी अमरहिंद मंडळाने आयोजित केलेल्या किशोर गट कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी दिली. महिला गटात डॉ. शिरोडकर स्पोर्टस् ने विजयी प्रारंभ केला. दादर, मुंबई येथील अमरहिंद मंडळाच्या पटांगणावर सुरू झालेल्या मुलांच्या उद्घाटनीय सामन्यात वीर नेताजी मंडळाने ५-५ चढायात श्री दत्त मंडळाला ३८-३६ असे चकवित विजयी सलामी दिली. विश्रांतीला १७-१५ अशी आघाडी घेणाऱ्या वीर नेताजीला श्री दत्त मंडळाने पूर्ण डावात ३१-३१ असे बरोबरीत रोखले. पण ५-५ चढायात मात्र त्यांना २ गुणांनी पराभव पत्करावा लागला. रियान बर्गे, ओम् गावडे वीर नेताजी कडून, तर आर्यन पवार, श्री महाडिक श्री दत्त कडून उत्कृष्ट खेळले. दुसऱ्या सामन्यात संस्कृती प्रतिष्ठानने चुरशीच्या लढतीत श्री गणेश मंडळाचा ४७-४५ असा पाडाव केला. संस्कृतीने निशांत सिंग, राहुल जाळवी यांच्या आक्रमक सुरुवातीमुळे पूर्वार्धात ३०-२१ अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात श्री गणेशच्या अजित कुमार, आर्यन मिसाळ यांनी आपला खेळ अधिक उंचावत पराभवातील अंतर कमी केले.

याच गटात रणझुंझारने अत्यंत कडव्या लढती नंतर पंचगंगा मंडळाला ३८-३२ असे नमवित आगेकूच केली. मध्यांतराला २५-२४ अशी रणझुंझार कडे आघाडी होती. भावेश शिंदे, प्रफुल्ल रणझुंझार कडून तर आर्य पाटील, पार्थ पंचगंगा कडून उत्तम खेळले. महिलांच्या उदघाटनिय सामन्यात डॉ. शिरोडकर स्पोर्टस् ने चंद्रोदय मंडळाचा ५३-३३ असा पाडाव केला. धनश्री पोटले, वैष्णवी यांच्या चतुरस्त्र खेळाने पहिल्या डावात ३१-११ अशी आघाडी घेणाऱ्या शिरोडकरला नंतर चंद्रोदयने बऱ्यापैकी लढत दिली. श्रेया हळदणकर,कोमल गुरव यांनी चंद्रोदय कडून उत्तम लढत दिली. या स्पर्धेचे उद्घाटन प्रिया कुलकर्णी,पदमा दिवाण, रंजना मंत्री, मुंबई शहर कबड्डी संघटनेचे सचिव विश्वास मोरे, स्पर्धा निरीक्षक सुशील ब्रीद आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

**इतर निकाल संक्षिप्त :-** किशोर गट १)डॉ. आंबेडकर वि. वि. ओम् ज्ञानदीप(६०-३९), २)न्यू परशुराम वि. वि. बंड्या मारुती(५४-३०), ३)आकांक्षा वि. वि. सिद्धी प्रभा(५३-२२).

## 'भाकप' चे त्रेवार्षिक अधिवेशन जुनोनी येथे संपन्न

**अक्षराज: राजू गागरे**

**दि.२२, झरी (यवतमाळ) :** भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे झरीजामनी तालुका त्रैवार्षिक अधिवेशन जुनोनी येथे संपन्न झाले. अधिवेशनाला जिल्हा सहसचिव कॉ.बंडु गोलर व तालुका सचिव कॉ.वासुदेव गोहणे मार्गददर्शक म्हणुन उपस्थित होते.अधिवेशनाला झरी तालुक्यातील ११ शाखेचे पदाधिकारी ४० पुरुष दहा महिला हजर होत्या.याप्रसंगी ५१ सदस्यीय तालुका कौन्सिल निवडण्यात आली. कॉम्रेड वासुदेव गोहणे यांची तालुका सचिव म्हणून निवड करण्यात आली. तालुका सहसचिव म्हणून भवानी गेडाम व पुंडलिक गाडगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. शेतमजूर युनियन प्रभारी तालुका सचिव म्हणून सुधाकर गोहणे यांची निवड करण्यात आली. ए.आय.एस.एफ.प्रभारी तालुका सचिव सचिन गोहणे यांची निवड करण्यात आली.तालुका कौंसिल सदस्य म्हणुन पोतू कुंबरे, बापूराव आत्राम, ईश्वर गाडगे, गजानन गेडाम, ईश्वर गाडगे, रमेश कुडमिते, लक्ष्मण आत्राम, दौलत मडावी, शत्रुघन कुचनकार, रमेश टेकाम, रुखमा कुमरे, रामू बाई आत्राम, रामदास कुमरे यांची निवड करण्यात आली.